# कोल्हापूर महानगरपालिका

## जाहीर प्रसिद्धीकरण

## परिशिष्ठ - 'अ'

### महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५, कलम ३ अन्वये कोल्हापूर महानगरपालिकेने जाहीर करावयाच्या लोकसेवांचा तपशील

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५, कलम ३ अन्वये राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोजित लोकसेवा देण्याकरिता, तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ दिनांक २८ एप्रिल २०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. त्यानुसार कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अनुषंगाने यापूर्वी दिनांक १० मे २०१८ रोजी लोकसेवांचे महाराष्ट्र शासन राजपत्र प्रसिध्द करण्यात आले आहे.

आता, कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील पात्र नागरिकांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीने शासन निर्णयातील तरतूदीनुसार लोकसेवा देण्यासाठी महानगरपालिका स्तरावर प्रसिध्द करावयाच्या सुधारित ५२ सेवा निश्चित करण्यात आलेल्या असून त्यांचे दर/फी, तसेच त्यांची अंमलबजावणी करणारे पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी व द्वितीय अपिलीय प्राधिकारी आणि विहित कालमर्यादा अधिसूचित करणेबात कार्यवाही करण्यात येत असून यापूर्वी अधिसूचीत करण्यात आलेल्या ३८ सेवांमध्ये दुरुस्ती करुन नव्याने प्रसिध्द करावयाच्या एकूण ५२ सेवांचा तपशील राजपत्रातील परिशिष्ठ 'अ' मध्ये नमूद केलेला आहे. सदरचे राजपत्र कोल्हापूर महानगरपालिकेच्या https://web.kolhapurcorporation.gov.in/circular# या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

सही/- उपआयुक्त (२)
कोल्हापूर महानगरपालिका

लोकमत ५/३/२०२४

Scanned with OKEN Scanner